संदर्भ

# अज्ञातनाद

'महाराष्ट्रशारदा-मंदिरा'चीं

प्रकाशित झालेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| श्रीमहाराष्ट्र-शारदा | १꠸८ |
| अभागी कमल | ꠸१२ |
| अज्ञात-नाद | ꠸८ |

गोंधळेकर बुकडेपो,

बुधवार, पुणें.

# अज्ञात-नाद

## — १ —

दिनकर गंगाधर केळकर

रामनवमी, १८४६

श्रीमहाराष्ट्र-शारदा-मंदिर, पुणें.

सोल एजंटस्:—

रा. श्री. गोंधळेकर यांचा बुकडेपो,

बुधवार चौक, पुणें

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले, ८७ नारायण, पुणें.

[ या पुस्तकाबद्दलचे सर्व हक्क श्रीमहाराष्ट्र शारदा मंदिरानें लेखकास कायमचे दिले आहेत. ]

मुद्रक
गणेश काशीनाथ गोखले, सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
( ४९५ शनवार पेठ, पुणें ) यांनीं पान १ ते ६४ पर्यंतचा भाग
व
कव्हरसह बाकीचा सर्व भाग अनंत सखाराम गोखले, यांनीं आपल्या
'विजय' प्रेस ( ५७० शनवार, पुणें ) मध्यें छापिला.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| वंदे मातरम्. | १ |
| पुणें दरबारीं. | २ |
| ही घे तल्वार. | ३ |
| मायभूमी. | ४ |
| सरदार धन्य एवढा. | ५ |
| नवलाख झुले लश्कर. | ६ |
| तिचे बाबा. | ७ |
| पर्वती. | ८ |
| उलटल्या उरांत कट्यारी. | ९ |
| हुकुम रोकडा मान्य करीं. | १० |
| कर्मवीर. | ११ |
| रावबाजीची पर्वती. | १२ |
| निशिदिनीं तळमळे भूजननी. | १३ |
| तुम्हां वेड लावूं. | १४ |
| फेका फेका भाला. | १५ |
| स्वर्गाहुनी सुंदर. | १७ |
| चंद्रावरील डाग. | १८ |
| बाहुलीचें लगीन. | १९ |
| निशाणासाठीं. | २० |
| गडे सुधे ! | २१ |
| असें जग हें माहेर उपेक्षेचें. | २३ |
| वरात. | २४ |
| अंधार. | २५ |
| चंद्रिका उदेली. | २६ |
| हौस नाहीं भागली. | २८ |
| तरी अंतरिं मी पाखरूं उदास. | २९ |
| आजकालची गोष्ट. | ३० |
| महात्मा. | ३२ |
| हीच ती लढाई. | ३३ |
| पोरकीं मुलें. | ३५ |
| काजवा. | ३६ |
| निष्ठुरा ! | ३७ |
| उदासीन | ३८ |
| पांखरा ! | ३९ |
| संध्याकाळ. | ४१ |
| दुर्दिन आणि दिवाळी. | ४२ |
| द्वाड मनी. | ४३ |
| तेव्हां आणि आतां. | ४४ |
| कला आणि भावना. | ४५ |
| जाणीव आणि मरण. | ४६ |
| कळली तव मायावी करणी. | ४७ |
| देवापाशीं गरिबाचें मागणें. | ४८ |
| आगरकर. | ४९ |
| मायबापा. | ५० |
| रवि तळपे डोईवर. | ५१ |
| निरोप. | ५२ |
| बाळांनो ! | ५४ |
| उभा 'चोखा' बाहेर. | ५५ |
| सह्याद्रींतील वर्षाकाळ. | ५६ |
| जाणिवेचें शल्य. | ५९ |
| म्याक्स्वेनी. | ६० |
| शर सुटला भात्यांतुन. | ६१ |
| आनंद आणि विरह. | ६२ |
| होई न उणें कोठार तरी. | ६३ |
| हरि सखाराम गोखले. | ६४ |

मातृ-पितृ-चरणीं

समर्पण.

# प्रस्तावना

स्वतःला जें सांगावयाचें असतें तें आपल्या पुस्तकांत सांगितल्यानंतर प्रस्तावनेंत केवळ आभारप्रदर्शनावांचून कोणतेंच काम लेखकाला राहिलेलें नसतें. दुकानदारानें आपल्या तयार मालाची कितीही तारीफ केली, एकही दोष दाखविला नाहीं, उलट झांकून ठेविला तरी व्यवहारांत तें गैर दिसत नाहीं. पण पुस्तकाची गोष्ट तशी नाहीं; निदान आम्हांला तरी तसलें धाडस करावयाचें नाहीं म्हणून अंगभूत असलेल्या गुणदोषां-सकट, जसेंच्या तसें हें पुस्तक वाचकांच्या हातीं देत आहों. अर्थात्, या-कामीं ज्यांनीं फार मदत केली त्यांचे आभार मानणें एवढेंच या प्रस्तावनेचें कार्य आहे.


'श्रीमहाराष्ट्रशारदा' मंदिरानें हें पुस्तक आपलें म्हटल्याबद्दल आम्ही मंदिराचे फार आभारी आहों. ज्यांना या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची 'सोल एजन्सी' दिली आहे त्या गोंधळेकर बुकडेपोचे मालक **नानासाहेब गोंधळेकर**, यांनीं व्यवहारदुर्लभ असें जें सौजन्य दाखविलें त्याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों.

आमचे मित्र मुद्रणकलाभिज्ञ **आप्पासाहेब गोखले**, यांनीं या पुस्तकां-तील त्यांचेकडील भाग सुंदर छापिला याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

प्रस्तावना संपली. तथापि ज्या एका गोष्टीनें यावेळीं हृदय गहिंवरून आलें आहे ती गोष्ट येथें लिहिल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं. ती गोष्ट हीच कीं, माझे वडील बंधु आप्पा यांच्या प्रेमळ, सुखमय व काव्यमय छायेखालीं बसूनच ही गोष्ट मला करितां आली आहे आणि म्हणून याचें सर्व श्रेय केवळ त्यांचें आहे.

शांतिकुंज, पुणें शहर.<br>
वर्षप्रतिपदा १८४६.

**अज्ञातवासी**



लेखक

## वंदे मातरम्.

गिरिकंदर माळरान
ह्या हिरव्या खोऱ्यांतुन
प्रेमभरें निघत स्वन—वंदे मातरम्. १

येई उकलून धरा
वाहे त्यांतून झरा
उसळे गंभीर गिरा—वंदे मातरम्. २

गरिबाच्या झोपडींत
हांकेला हांक येत
घुमघुमतो ध्वनि जागृत—वंदे मातरम्. ३

उंच उंच हे महाल
विलासांचे रखवाल
गाती तेही खुशाल—वंदे मातरम्. ४

पायांत मण लोखंड
बध्द दोन्हीहि दंड
शृंखलेंत ध्वनि प्रचंड—वंदे मातरम्. ५

स्तंभावर शिर लटकत
ऐका पण, स्पष्ट येत
ध्वनि नव चैतन्य देत—वंदे मातरम्. ६

लागे सरण्यास तिमिर
तेजोमय ये भास्कर
घुमघुमतो ध्वनि सुंदर—वंदे मातरम्. ७

# पुणें दरबारीं.

शत्रुच्या खड्या समशेरी
वांकती पुणें दरबारीं
पेशवे मऱ्हाटी स्वारी
तळपती तिखट तल्वारी.

तो वाघ, वाघ म्हैसुरी
कांपतो उरीं
टिपू चौधारी
तळपती तिखट तल्वारी. १

चौघडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तल्वारी. २

इंग्रजी बावटा धीट
पहा, थरथरत
ऐकतां भेरी
तळपती तिखट तल्वारी. ३

रणरंग पुण्यांतिल दंग
बांधुनी चंग
घेति ललकारी
तळपती तिखट तल्वारी. ४

वांकती थोर सरदार
दिल्लिचे वीर
पुणें दरबारीं
तळपती तिखट तल्वारी. ५

फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फेरी
तळपती तिखट तल्वारी. ६

केवढी! पुण्याची भिती
पहा, कांपती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी. ७

---

## ही घे तल्वार.

घेइ तल्वार, जीवाची पंचीप्यार

ह्या खड्गाच्या जोरावरती
राष्ट्राचें यश आणिक कीर्ती
राखियली हें ठेवीं चित्तीं
हाच श्रृंगार जीवाची पंचीप्यार. १

स्वतंत्र ही जन्माची सुमती
प्रसंग ये जरि प्राणावरती
नको वांकवूं शत्रू-पुढती
खडी समशेर, जीवाची पंचीप्यार. २

मर्द मराठे वीर झळकती
जगांत एकच ते ओळखती
स्वदेश आणिक स्वतंत्रता ती
पुरा निर्धार, जीवाची पंचीप्यार. ३

डोळेभर तें खड्ग पाहुनी-
(झरझर पाणी वाहे नयनीं)
निजला. झाली विव्हल धरणी
हाय अंधार, जीवाची पंचीप्यार. ४

# मायभूमी.

ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरीं
जननि गे, तुझें
श्रीहरीपरी
मधुर नाम घुमघुमतें सतत हृदयमंदिरीं.

काल तुझे वीरमणी
चमकले रणांगणीं
आणि आज तेच गुणी
दास आपुल्या घरीं
ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरीं. १

दाटुनिया येत गळा
पाहतां अशी तुला
भासतसे कीं मजला
खुपसली सुरी उरीं
ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरीं. २

शांति धरिलि आजवरी
क्लेश होति अंतरीं
जीव हाय हाय करी
डागण्या कितीतरी
ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरा. ३

तनुमनधन तुज जननी
होय मुक्त अर्पुनी
देह पडो तव भजनीं
आस पूर्ण ही करीं
ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरीं. ४

## सरदार धन्य एवढा.

धडधडा झडे चौघडा, गडावर चढे मर्द फांकडा
अवघड गड अस्मानीं डोले
वरती बघतां फिरतिल डोळे
खालीं पाताळांतिल इमले
आसऱ्यास बाजुस कडा, गडावर चढे मर्द फांकडा १

अजुनि तांबडें नाहीं फुटलें
फटीफटींतुनि गवत कोंवळें
वाऱ्याच्या झुळुकेनें हाले
शोभतो दंवाचा सडा, गडावर चढे मर्द फांकडा. २

हातांतिल तल्वार ठिबकते
पाठीवर वाघीण नाहते
'करील कौतुक ती'-मन वदतें
चालला शिपाई खडा, गडावर चढे मर्द फांकडा. ३

गडावरुन खिडकींतुन कोणी
एकसारखी टक लावोनी
बघे स्वारिला डोळे भरुनी
सरदार धन्य एवढा, गडावर चढे मर्द फांकडा. ४

# नवलाख झुले लष्कर.

नवलाख झुले लष्कर, तळपे भाला वरच्यावर
दिसतें एकच वर अंबर
खालीं सैन्याचा सागर
नाहीं नजर ठरत त्यांवर
जरिपटका डौलांत डोलतो भरजरि हत्तीवर
नवलाख झुले लष्कर. १

हौदा सोन्याचा सुंदर
वरती मोत्यांची झालर
भाऊ-दाक्षिणचा दिनकर
स्वर्गाचें सौंदर्य लोटलें ह्या तर सैन्यावर
नवलाख झुले लष्कर. २

बक्मार चमके तल्वार
रणमस्त तुफानी स्वार
गर्जति "महादेव हर हर"
रोखून चालले पानिपतावर पुण्यपत्तनेश्वर
नवलाख झुले लष्कर. ३

कडाडा वाजतसे तंबुर
कांपे तो मोंगल थरथर
मऱ्हाठि थोर थोर वीर
पुण्यवंत श्रीमंत पेशवे विजयी होणार
नवलाख झुले लष्कर. ४

# तिचे बाबा.

घरीं जा त्या-आनंद बहरलेला
दिसायाचा तो नेहमीं तुम्हांला
मधूदादाची बहिण कमूताई
तिचेवांचुन करमे न कुणालाही. १

तिनें पुरते नाहींत पाहियेले
अजुनि कैसे ते पांच पावसाळे
बालबुध्दी पण कळे सर्व कांहीं
बाहुलीचें ती लगिन लावितेही. २

झोंक पाहुनि घ्या तिच्या परकराचा
नोंक पाहुनि घ्या तिच्या चालण्याचा
नवी तसबिर माडींत टांगलेली
पहाण्याची तर पहा, तिची शैली. ३

जणूं तिजला कळतेंच सर्व कांहीं
अशा थाटानें बघत उभी राही
ओळखीचा चेहरा दिसे तीस
तिचे बाबा ते-सांगणें कशास! ४

कितीदां ती आईस हांक मारी
म्हणे चल गे दावीन मौज सारी
मधूदादानें असे आणियेला—
पुन्हां बाबाला चलच बघायाला. ५

'पुन्हां बाबाला-चलच बघायाला'
शब्द साधे हे वदुनि जात बाला.
माय तीची (गतधवा) वदत नाहीं
अश्रुंवांचुन दिसतें न तिथें कांहीं. ६

# पर्वती.

हीं पुण्याचीच पर्वती.
मनिं विचार येती किती.
तें पुणें-काय ही स्थिती!
निशाण जाउन काठीसाठीं आम्ही मरतों किती. १

हीं उंच उंच देवळें
मन बघतां बघतां झुले
ते दिवस अतां कोठले
अस्त जाहला घुबडें तेथें अशुभ काढिती गळे. २

हे भयाण वाडे जुने
त्यांतून भुतें भटकणें
नववैभव हें मानणें
धन्य धन्य त्रिभुवनांत ऐसा डौल पुन्हां मिरविणें. ३

वनराइ नटे भोंवती
ह्या मुळा-मुठा वाहती
ही धन्य धन्य पर्वती!
जरिपटका पण स्वजन तुडविती म्हणुनि मनीं खिन्न ती. ४

हे भाट अम्ही केवळ!
शब्दांत आमुच्या बळ
अंगांत केवढा पिळ
हाय! झालि घरकुलांत भाकर दुपारची दुर्मिळ. ५

हा निजलेला 'दक्षिण'
जातिवंत केसरी पण.
उगवणार लवकर दिन
नव्या युगाला स्वातंत्र्याचें हा बांधिल तोरण. ६

# उलटल्या उरांत कट्यारी.

( मागील सव्वाशें वर्षांचा इतिहास पाहून असेंच वाटेल. )

ऐरावत झुलती द्वारीं
तो त्याच महालिं भिकारी
गणगोत जाहले वैरी
उलटल्या उरांत कट्यारी.

रणदेवि काय कांचली
त्याच पाउलीं
गेलि माघारी
उलटल्या उरांत कट्यारी. १

घरभेद धर्म जाहला
कापती गळा
खुशाल दुपारीं
उलटल्या उरांत कट्यारी. २

श्रीमंत मातले किती
गरिब थरकती
नाहिं कैवारी
उलटल्या उरांत कट्यारी. ३

शाबूत रूढिचें तख्त
चहुंकडे भक्त
राज्य अंधारी
उलटल्या उरांत कट्यारी ४

आजला म्हणुनि हा फांस
लागला श्वास
उडे उर भारी
उलटल्या उरांत कट्यारी. ५

# हुकुम रोकडा मान्य करीं.

जरी गडावर मानकरी
हा इथें तरी चाकरी करी.

नंग्या तरवारिंत छावणि ही
खडा पहारा ठाईं ठाईं
दिंडीवर चुकविलास तोही
छाती ही केवढी तरी ! १

तुझें रूप; चंद्राची कांती
मदनिकाच तूं लावण्यवती
बिजली कीं ही चमके पुढती.
रूप तुझें जाळें पसरी. २

येथें दर क्षण असे भयंकर
कट्यार नंगी जणुं छातीवर
जबर कायदा हें तर लष्कर.
घात पुढें, गड सोड तरी. ३

आवस ही पसरे भंवतालीं
पौर्णिमाच तूं-त्यांत अवेळीं
फिर मागें नाइलाज, भाळीं
हुकुम रोकडा मान्य करीं. ४

* * *

मागें मागें कुणी परतलें
पैंजण पायीं नुदत चाललें.
नकळत कैसें चित्त भारलें
तीच वाट तो स्वीकारी
जरी गडावर मानकरी. ५

## कर्मवीर.

—आणि त्याला जा करा बंदिवान
दगड धोंड्यांचे रुंद तट रचून
बिड्या त्याच्या पायांत तुम्ही घाला
मोकळा तो—अडवील कोण त्याला? १

गडद अंधारीं रहायास खोली
उभ्या रोखा संगिनी भोंवताली
हिमालय तो—तो अचल राहणार
शांततेची मूर्तीच निर्विकार. २

पहा—त्यालागीं तुम्ही तपासून
निराळा तो भासेल जगाहून
जनाची पण काळजी त्यास जाळी
हृदय-स्थंडिल धगधगे सर्वकाळीं. ३

शरिर त्याचें तें, जणूं वाळलेलें—
गवत वाऱ्यानें मधुन मधुन हाले
साक्ष इतुकी—ह्याहून नसे कांहीं
श्वास त्याचा पण धरा हालवीही. ४

मातृदेशाचें चित्र मूर्तिमंत
बघा अपुलेंही हृदय असे ह्यांत
जीव त्याचा जीवांत गुंतलाहे
थोर ह्याहुन जगतांत कोण आहे? ५

## रावबाजीची पर्वती.

हीच का नानांची पर्वती? खालीं हत्ती झुलती किती!
वाजे सनइ गोड मंजुळ
वाटे गातो कीं कोकिळ
झडतो मंगलमय चौघडा
जमला ब्राह्मणगण केवढा!
शाली लालभडक भरजरी
तळपे भास्कर वर अंबरीं
धन्य हा बाजिराव नरपती
ही तर बाजीची पर्वती. १

वरचा चौक केवढा तरी
बसले ब्राह्मण पानावरी
भरले हौद तुपाचे किती
दुथडी रात्रंदिन वाहती
केवढा लाडूंचा डोंगर!
ही कढीच, कीं पीतसागर!
ब्राह्मण लक्षावधि पोसती
ही तर बाजीची पर्वती. २

हिकडे, वाद्यें मधु वाजती
तिकडे, ते इंग्रज डागती–
तोफा धाड धाड गर्जती.
पुण्यावर आला सागरपती
धिक धिक् बाजिराव भेकडा!
जा भर हातीं हिरवा चुडा.
कोपला दाक्षिणचा कुलपती
कुठले हत्ती आणिक रथी
हीच का नानांची पर्वती? नाच्ये सिंहासनिं नाचती! ३

# निशिदिनीं तळमळे भूजननी.

निशिदिनीं तळमळे भूजननी
कळवळा न कां ये तुज अजुनी ?
  निंदुनि जननी, भाई जगभर
  अन्नास्तव कां वांकविशी शिर ?
  उदरीं कांटे ह्याहुनि जा भर
कां धरा शिणविसी तूं जगुनी
कळवळा न कां ये तुज अजुनी ? १

  स्वच्छंदानें सह्याद्रीवर
  उघडे डोळे करुनी जा फिर
  ऐक काय तो दगडी डोंगर
तुजपुढें कथिल रे हळहळुनी
कळवळा न कां ये तुज अजुनी ? २

  भोंवतालच्या गडागडावर
  होतें फडकत गिरिशिखरांवर.
  नको आठवण—धडधडतें उर
वाहती अश्रु हे खळबळुनी
कळवळा न कां ये तुज अजुनी ? ३

  स्वतंत्र वारा वाहे सुंदर.
  खडी शाहिरी गात निरंतर.
  कुठें परंतू तूं—धिक्‌ पामर.
भूमाता रडविशि दिनरजनी.
कळवळा न कां ये तुज अजुनी ? ४

# तुम्हां वेड लावूं.

जशी वृत्ती त्या फूल-पांखराची
सतत गुंगत रानांत रहायाची
त्यास कांहीं नच सांज वा सकाळ
फुलांमधुनी तें उडतसे खुशाल. १

तसा मीही या सोडुनी जगाला
असे रमवित ह्या माझिया मनाला
कधींकाळीं येणार जें जगांत·
तेंच गुणगुणतों गीत मी मनांत. २

जगाचा मी बांधला दास नाहीं
जड जगाची पर्वा न मला कांहीं
निसर्गाचे पडसाद ऐकुनीया
गुंगतें मन, लागतें सहज गाया. ३

जगीं ज्याला म्हणतात जन विलास
वनींच्या ह्या बाळास ते कशास?
निसर्गाचें गाणार अम्ही गीत
अम्हां लाभे आमुचें निसर्गांत. ४

—आणि जेथें लाभतें असें कांहीं
सहज वृत्ती ही रमुनि तिथें जाई
दंग आम्ही मग नवें नवें गाऊं
आणि गाउनिया तुम्हां वेड लावूं. ५

# फेका फेका भाला.

एकला
वनीं मोकळा
स्वैर तो होता
दशदिशां दरारा त्याचा कसली चिंता. १

चळचळां
बघुनि त्याजला
कांपती क्रूर—
उन्मत्त श्वापदें–हा हिकडे गंभीर. २

तें रान
सुखाचें स्थान
जगाहुनि प्यार
त्याहून इतर जें, तें तें कारागार. ३

तेथला
झरा मोकळा
वाहतो त्यांत
प्रतिबिंब पाहुनी सहज गर्जना करित. ४

निःशंक
कशाची अटक
त्याजला घडते
तो राजा जिकडे जाइल तेथें तेथें. ५

ते दिवस
कधीं उपवास
घडुनिही त्याला
वाटले सुखाचे त्या मानी सिंहाला. ६

गर्जना
कधींही पुन्हां
तयें नच केली
उघडून पहा तें हृदय पेटली होळी. ७

खंगला
मृत्युची कळा
तयावर आली
हा खराखुरा वनराजा वैभवशाली. ८

झडकरी
तुम्ही त्यावरी
विखारी भाला
फेकून पहा–तो उत्सुकला मरणाला. ९

दिनरात
त्यास जाळीत
दुष्ट परवशता
जी अम्ही भोगितों तुकवुन अमुचा माथा. १०

सत्वरीं
म्हणुनि घ्या करीं
विखारी भाला
विनवितों अम्हांवर फेका फेका त्याला. ११

# स्वर्गाहुनी सुंदर.

व्यापाला विटुनी म्हणे मन-गड्या, जा दूर कोठेंतरी,
 कांहीं वेळ-म्हणून ह्या गिरिवरी येऊनिया बैसलों
 दृष्टीच्या पुढती उदात्त सगळें पाहूनिया रंगलों
कीं उत्साह सदैव वास अपुला मूर्तस्वरूपें करी.

ह्या येथील वनामधून दिसतें जीवंत जें जीवन
त्याचा अंशहि पाहण्या न मिळतो आम्हां हवेल्यांतुन
स्वातंत्र्यप्रिय येथला खळखळा वाहे झरा मोकळा
त्यायोगें पण पारतंत्र्य स्मरुनी दाटून येतो गळा.

स्वातंत्र्यप्रिय ही धरा जरि अम्हां आहे प्रभूनें दिली
 आम्हीं घालुन कुंपणें बसविलीं बंदिस्थ ठाणीं पण
घोका रोज धडे, शिका हरघडी तीं पुस्तकें फाटलीं
 चिंता एकच ह्या जगास—दुसरी पृथ्वी कशी निर्मिन.

माझ्या दृष्टिपुढें निसर्ग फुलला, वाचीन मी हा जर
हें आयुष्य सुरेख होइल किती स्वर्गाहुनी सुंदर.

# चंद्रावरील डाग.

जरा रोखुनि तर पहा दुर्बिणींत
डाग चंद्रावर दिसति असंख्यात
किती असले तेजाळ गोल पाहीं
उणें तेथेंही नसे असें नाहीं. १

स्वर्ग म्हणती सौख्यांत फार आहे
इंद्र तेथिल चिंतेंत परी राहे
कुठें कांहींतरि उणें असायाचें
म्हणुन आम्हीं का स्वस्थ रहायाचें? २

असे अपुला हा देश किती छान
तरी आपण आहोंत कळाहीन
विपुल पिकवी आपुली धरामाई
तरी गरिबांना खावयास नाहीं. ३

डाग ऐसे आहेत इथें फार
अंत्यजांना तरि लोटितोंच दूर
डाग मोठा हा कसा धुवायाचा?
कधीं होइल उध्दार बापुड्यांचा? ४

पुन्हां जोडा दुर्बीण पहायास,
डाग अपुला मोठाच असे खास,
जरी चंद्रावर डाग-लाज 'त्यास'
डाग अपुले हे-लाज ही कुणास? ५

# बाहुलीचें लगीन.

चिंता मजला ही, तुझें तर लगिन जमत नाहीं.

पिच् पिच् अगदीं त्याचे डोळे
मान मोडकी लटलट हाले
केस कशाचे-गवत वाळलें
नको ग तो बाई, तुझें पण लगिन जमत नाहीं. १

माझी नवरी किती चांगली
जशी हिरकणी दागिन्यांतली
पोर परंतू उभी वाळली
झोंप न हिज येई, तुझें पण लगिन जमत नाहीं ! २

तो 'तांब्याचा माधव' बघते
जरा आंधळा, मला चालतें
स्थळ थाटाचें कोठें मिळतें
कां पण रुसली ही, तुझें तर लगिन जमत नाहीं. ३

नकोच तो तर, अडल्या वेळीं
नवरा होइन मीच आपुली
ही घे आतां साडी चोळी
खुद्कन् हंसली ही, तुझें पण लगिन जमत नाहीं. ४

## निशाणासाठीं.

बघे मागें मग सारखा वळून
बाळ, डोळे भरुनिया फिरफिरून
आणि जेव्हां जाहलें दिसेनासें
काय त्यातें वाटलें, वदूं कैसें? १

जसें आईपासून मूल न्यावें
हृदय तीचें त्यामुळें पिळवटावें
काय उपमा दुःखास अशा द्यावी
जाणिवेनें कळल्यास करुनि घ्यावी. २

स्वदेशाचें तें परम प्रिय निशाण
दूर होतां; आलेंच खळबळून
देह कोणीं ओढिला पाशबद्ध
प्राण परि तो तेथेंच प्रेमबद्ध! ३

रात्र किरकिरते आंत त्या मनांत
दिसे जनता जरि चूर उत्सवांत!
मार्ग कष्टाचा-हाल-अपेष्टांचा
गमे त्याला मोकळा उन्नतीचा. ४

जरी त्याचें कोवळें हृदय होतें
तरी वज्राहुनि कठिणची अतां तें
टिपें त्याचीं फुलवितिल बाग जेव्हां
विस्मयें जग होईल थक्क तेव्हां. ५

# गडे सुधे !

आणिली
नवी बाहुली
तुला मीं बाई
चल थाट नवा संसार, तुझा मी भाई ! १

हांसशी
काय ही अशी
पिसें कां भरलें
घरधनीण तूं, हें काय लाविशी चाळे ! २

लांबून
चाफळाहून
हा पहा आला
'यशवंत' तयाला पाज सुधेचा पेला ! ३

संसार
नव्हे-अंगार
धगधगे भंवतीं
म्हणुनीच आमुची जडली तुजवर भक्ती ! ४

तूं फूल
पाडिशी भूल
आमुच्या भंवती—
फुलबाग उभविशी तेथें अमुची वसती ! ५

बाजुला
दूर व्हा-चला
अश्रुंनों, आतां
कां पुढें टाकतां-मागें मागें परतां. ६

क्षणभरी
विसरुं द्या तरी
आमुचे व्याप
वाढत्या काळज्या आणि ताप-संताप. ७

मृग झुले
तसें मन भुलें
तुझ्या नादानें
वाटतें धरा ही फुलली आनंदानें. ८

ह्यामुळें
इथें मन खुले
तुला पाहोनी
त्यामुळेंच, नकळे तुला गोविलें कवनीं. ९

अपुरेंच
गीत साधेंच
अर्पिलें तुजला
पण गडे ! सुधे तूं म्हणशिल ना मज ' अपुला.' १०

## असें जग हें माहेर उपेक्षेचें.

घर तयाचें तें जरी चंद्रमौळी
प्रीत त्याची त्यावरी जडुनि गेली
दूर कोंकण येथून फार आहे
जीव त्याचा तेथेंच गुंतलाहे. १

कधीं नव्हतें ठाऊक अजुनि त्यास
दूर जाणें त्या सोडुनी घरास
माय त्याची आंधळी घरीं राही
दैव त्याला तेथून दूर नेई. २

वय तयाचें अजुनी न मुळीं फार
कष्ट त्याला हे कसे झेपणार!
बाळ आईस्तव असा राबतांना
देवराणा कां कळेना द्रवेना! ३

आज त्याला उठवे न मुळिं सकाळीं
ताप भरला सारखा त्यास जाळी
कोण तिकडे पाहतो जग न त्याचें
असें जग हें माहेर उपेक्षेचें! ४

आणि गेला अस्तास अंशुमाली
बाळ निजला तो त्याच शांत वेळीं
आणि निजला तो कधिं न उठायाचा
तिलांजलि हा अर्पितों आंसवांचा! ५

# वरात.

चालली पहा वरात, गजहि झुलति डौलांत.
डुलत चंद्र अंबरीं
खुलत रजनिसुंदरी
शालु शुभ्र भरजरी
नटुनि थाटमाटांत, चालली पहा वरात. १
गमत रमत चालतीं
चालली वरात ती
वरति कोण, एकटी
बाजुच्याच त्या घरांत, चालली पहा वरात. २
चांदणी ढगांतली
कोमला सुके कळी
खिडकिआड राहिली
ती पहा उभी पहात, चालली पुढें वरात. ३
चंद्रज्योत पेटते
सनइ मंजु वाजते
पण, तिचें विदारितें—
हृदय कां अशा वयांत, चालली पहा वरात. ४

* * *

वर्ष अजुनि कोठलें!
तोंच गगन फाटलें
अश्रु हातिं राहिले
तिजसि जगत भस्मसात, चालली पहा वरात. ५

# अंधार.

अंधार पुढें—न दिसे, न कळे
सहज त्यामुळें हृदय उलें.
  जागेंपण केव्हांचें भासें
  मन विटलें देऊन उसासे
  ढग अश्रूंचे बघुनी हासें
शिंपित पण त्यानेंच मळे
सहज त्यामुळें हृदय उलें. १

  वारा वाहतसे बाजूला
  जीर्ण पर्ण वाजतें सळाळा
  कानोसा देतोही त्याला.
ऐकुं न ये; पण काळ पळे
सहज त्यामुळें हृदय उलें. २

  कवडासा नाचतो भुईवर
  दृष्टि खिळे कांहींशी त्यावर
  आशेला ये अंकुर नवथर
पण तिकडे-तो देव कळे
सहज त्यामुळें हृदय उलें. ३

  तिमिर तिमिर-दाटतो त्यामुळें
  मागें मागें पडति पाउलें
  मंदिर ढांसळलें जें रचिलें,
वृक्षाची तुटलींच मुळें
सहज त्यामुळें हृदय उलें. ४

# चंद्रिका उदेली.

चंद्रिका उदेली, धरणि मुदित झाली.
हृदयाची स्वामिनी
राधिकेसम न कुणी
मुरलिनाद ऐकुनी
कां न सखी आली? चंद्रिका उदेली. १

गोपिकांत गोकुळीं
रम्य केलि चालली
हरिस काय विसरली
राधिका न आली; चंद्रिका उदेली. २

शीत झोत वायुचा
लुटत नाद वेणुचा
श्रीहरी सखा जिचा
ती सखी न आली, चंद्रिका उदेली. ३

गगनिं कोर हांसरी
वेणु नुदत श्रीहरी
बैसला तृणावरी
डुलत चंद्रमौली, चंद्रिका उदेली. ४

नाचती वनीं फुलें
परमरूप कोवळें
चंद्रिकेंत शोभलें
परि सखी न आली, चंद्रिका उदेली. ५

विश्व डुलत गुंगुनी
मुरलिनाद प्राशुनी
राधिका परी वनीं
कां न अजुनि आली, चंद्रिका उदेली. ६

दृष्टिआड राहुनी
बघत रमणि चोरुनी
सहज हंसत ऐकुनी
' कां न सखी आली,' चंद्रिका उदेली. ७

बघुनि हळुच प्रेमला
हरिहि हळुच हांसला
वेणुनाद नादला
कां न सखी आली, चंद्रिका उदेली. ८

मधु मीलन जाहलें
रंग गालिं उमटले
अजुनि गीत रंगलें
कां न सखी आली? चंद्रिका उदेली. ९

# हौस नाहिं भागली.

हौस नाहिं भागली, असे भुई नाकाला लागली!
लालभडक पायांत पुणेरी
नागपुरी अंगावर भारी
गुलाबकळि फेटा जरतारी
स्वारि किती रंगली, असे भुई नाकाला लागली. १

खोल खाण डोळ्यांची झाली
देउळांतली आलीगेली
नार नाहिं दृष्टींतुनि चुकली
हौस नाहिं भागली, असे भुई नाकाला लागली. २

निवडक गजरा हातीं रुळतो
सुवास अंगावर दरवळतो
मुखरस एका बाजुस गळतो
स्वारि किती रंगली, असे भुई नाकाला लागली. ३

आडवाट ही-अवेळिं झुकले
कोणिकडे हे जवान न कळे
रामनाम पण अखंड चाले
कोण नार भाळली, असे भुई नाकाला लागली.

## तरी अंतरिं मी पांखरूं उदास.

तुझ्या स्कंधावर हेच हात होते
आणि तूंही ठेविशी आपुले ते
नाहिं कां मग वाटलें आपुल्याला
विरह केव्हांही नको व्हावयाला. १

जरी अपुला हा मार्ग समुद्रांत
जरी वादळ गे, रोज रोज होत
रोज पडतो अंधार किति भयाण
नाहिं दोघेंही तरी उदासीन. २

काळ आहे जरि धुक्याच्याप्रमाणें
प्रवाहांतच जरि कसेंतरी जाणें
भय न केव्हां तें कुठें वाटलेंही
स्वर्ग अपुल्या चित्तांत सदा राही. ३

आणि आतां जरि ऊन असे छान
असे सागरही शांत चहुंकडून
नाव माझी चालली सावकाश
तरी अंतरिं मी पांखरूं उदास. ४

दिवस तेव्हांचे असे आठवीत
स्मृती जागृत मज तीच दुःख देत
नसे पर्वा मज घोर तुफानांची
विरह तूझा-मज सखे, फार जाची. ५

# आजकालची गोष्ट.

रात्र उलटुनी गेली नव्हती
स्वप्नीं दंग धरित्री होती
आनंदाचा पडतो पाउस
फिका पडे त्यापुढें सुधारस
चांदीच्या नौकेंत एकटा
वरी चंद्रमा पेंगत होता
तारे मधुनी मधुनी चमकत
हलते ढगही होते फिरकत. १

लहान खेडें छोटेखानी
चांदण्यांत किरणांशीं खेळे
उमटतात ओढ्यांचीं गाणीं
पान सळाळा मधेंच हाले
अल्लड आणि मुकी मनसृष्टी
प्रेमाच्या करिते गुजगोष्टी
सृष्टीचें हें वैभव सुंदर
पहा जरासें अनुभवुनी तर. २

गरिब झोपडी ही खेड्यांतिल
कितीतरी मोहिते मनाला
खरेंच ! येथिल सगळे असतिल-
सुखी, सुखाचा पिकलाच मळा
सुख एकिकडे-आम्ही सांप्रत
छायेला सुख म्हणुनी बिलगत. ३

एकलीच झोपडींत कोणी
मुका पशू बाहेर इमानी
मीठ आणि भाकरीस जागत
पशू न झाले अजुनि अधोगत
हृदयें अपुलीं उघडून जरा
पहा–आरसे समोरच धरा. ४

अवेळ ही पण जिथें भंगली–
आशा तेथें निद्रा कसली!
इतक्यांतच; म्हातारी उठली
(झोंप तरंगत पण डोळ्यावर)
काय काळजी हिजला कसली?
कां पण दिसते ही चिंतातुर
हळू हळू पुटपुटते मधुनी
आंसवें उभीं खोल लोचनीं. ५

शील आणि सत्वाचा इमला
जखम उरीं जाहली जयाला–
बाळ हिचा लाडका न येथें
तुरुंगांत तो आहे खितपत
आणि म्हणुन ही अश्रूंस पिते
देशभक्तिचें बक्षिस सांप्रत.

* * *

वृद्धेच्या हृदयाचा चटका
येइल शांतवितां मजला का? ६

## महात्मा.

जग विलासांत रंगलें
तो तुरुंगांत तळमळे.

महालांतली दृष्टी कोती
गरिब झोपडीं निद्रेंतच ती
इतर बापुडे कष्टी खपती
हा एक वीर मानिं उले. १

देशासाठीं ह्याचें जगणें
देशासाठीं ह्याचें मरणें
देशभक्तिचें अखंड गाणें
शृंखला तुटे त्यामुळें. २

कोहिनूर हा नररत्नांतिल
अंगावर पण ह्याच्या वाकळ
यज्ञाची ही मूर्ती केवळ
जग पापांतुन उजळलें. ३

गुलाम आपण, स्वतंत्र हा पण
मरमर खपतो तरि रात्रंदिन
खालीं वांका शरमुन लाजुन
कां नाहीं हृदय भंगलें. ४

धूळ जगाची ह्याच्या भाळीं
तुडवी कांटे पायाखालीं
ही पण जाणिव अम्हां न पटली
हा जीव म्हणुन हळहळे. ५

## हीच ती लढाई.

बाई, हीच ती लढाई, रडविते मज धाइधाई.
बाप जाहला पुरा आंधळा
भाऊराया लढतां मेला
दादाचा तर पायच गेला
उरलें गांठिस नच कांहीं, रडविते मज धाइधाई. १

शेत आमुचें लहान होतें
उणें कशाचें पडलें नव्हतें
लहान घर आमुचें छान तें
आतां कोठें नच कांहीं, रडविते मज धाइधाई. २

आग लावुनी शत्रू गेला
माझा तान्हा त्यांत जळाला
नाश घराचा पुरता झाला
मन हें वेडावुन जाई, रडविते मज धाइधाई. ३

स्वर्गी सोन्याचे-'ते'-झाले
प्राण आमुचे मागें उरले
देवा! मन सारखें तळमळे
दया तुजसी नाहिं कांहीं, रडविते मज धाइधाई. ४

काय फायदा नकळे झाला
'विजय' जनीं म्हणतात मिळाला
उसंत रडतां नाहिं अम्हांला
डोक्यावरुन लाट जाई, रडविते मज धाइधाई. ५

गरिब अम्ही मोताद जाहलों
जगण्यानें तर पुरते मेलों
दुःख भोगण्यासाठीं उरलों
तुफान नाव वाहते ही, रडविते मज धाइधाई. ६

देशासाठीं हें पण सगळें
सुखानेंच पाहिजे साहिलें
समाधान हें एकच उरलें
सीमा दुःखाला नाहीं, रडविते मज धाइधाई
बाई, हीच ती लढाई. ७

## पोरकीं मुलें.

कांहीं सुचतच नाहीं, मजला गांवाला नेई.

बग्गी घेऊ बसावयाला
तूं हो त्यावर गाडीवाला
आण तुझा तो खाकी डगला
दादा, कर तर घाई, मजला गांवाला नेई. १

बसे बाहुला ओटीवरती
राखील तुझी ओली पुस्ती
घे हा चाबुक अपुल्या हातीं
कांहीं सुचतच नाहीं, मजला गांवाला नेई. २

जेथें गेली बाबा आई
तेथें अपुली गाडी नेई
येथें मजला करमत नाहीं
आतां रडूच येई, मजला गांवाला नेई. ३

* * *

खडखड खडखड गाडि वाजली
बहीणभाऊ आंत बैसली
जी गेली ती परत न आली
खेदें गुंगत मीही, 'मजला गांवाला नेई.' ४

# काजवा.

रवि तिकडे बुडतो जळीं
काजवा धरणीवरती बळी.

किती फुलें कोमेजुन गेलीं
कासारीं कमलेंही मिटलीं
फुलांफुलांवर कळा निराळी
मग गळे कितीएक पाकळी
काजवा धरणीवरती बळी. १

अस्मानीचा निळा पसारा
मधेंच कोठें चमके तारा
अंधाराचा त्यांत दरारा
काजळी अशी रात भूतळीं
काजवा धरणीवरती बळी. २

दिसें त्यामुळें भयाण भंवतीं
बघा कुठें ही दडपे छाती
नवल न ऐशा मग एकांतीं
रवीशीं तेज आपुलें तुळी
काजवा धरणीवरती बळी. ३

नियमच ऐसा हा काळाचा
पदोपदीं ये अनुभव याचा
तुटतें अंतर, फुटे न वाचा
रवि तिकडे बुडतो जळी
काजवा धरणीवरती बळी. ४

## निष्ठुरा!

निष्ठुरा, कापलासि कीं रे गळा, वाहती बघ अश्रू खळखळा.

त्या दिवशींचा डौल तुझा तो
अजुनी मजला पुरता स्मरतो
बेफाम वारु गड कांपित चढतो
तरंगे झोंकदार पटका खुला, वाहती बघ अश्रू खळखळा. १

शेवटच्या किरणांत तळपला
माझ्या ओळखिचा तो भाला
आणि तटावरुनी मीं अपुला
नाहिं का हा हात खुणविला तुला, वाहती बघ अश्रू खळखळा. २

आंब्यावरचा गळला मोहर
कोकिळ म्हणुनी उडला सत्वर
धीर धरूं मी राया, कुठवर
मोहिनी घातलीस माझ्या फुला, वाहती बघ अश्रू खळखळा. ३

जात बाइ ही अमुची भोळी
तुझी सख्या, मीं मूर्ति कोरिली
आठव आठव बुरुजाखालीं
तूंच ना हृदयांत बाण मारिला, वाहती बघ अश्रू खळखळा. ४

# उदासीन.

खुळा त्याला म्हणतसे गांव सारा
कुठेंही जा गांवांत हें विचारा
हेंच उत्तर मिळणार तुम्हां खास
जगत त्याला, तो जगाला उदास. १

पिके गांवाजवळील आंबराई
तिथें जाणेंही त्यास रुचत नाहीं.
भजन चाले जवळील देउळांत
तरी त्याचें मन रमेनाहि तेथ. २

'थोर झाली रे पोर'-गांव बोले
-लगिन तीचें कर दिवस सरत आले-
तरी त्याचें मन वेध घेत नाहीं
अशी त्याला दुःस्थिती प्राप्त होई. ३

पावसाळ्यामागून ये हिंवाळा
आणि आतां तर रखरखे उन्हाळा
ऋतू बदले-चहुंकडे फरक होई
हाच एकाकी ह्यांत फरक नाहीं. ४

रात्र पडल्यावर बसे अंगणांत
नभीं तारा चमकती-त्या पहात
जगाविरहित हा असे उदासीन
तिचे मागुन-त्याजला जगत शून्य. ५

# पांखरा !

थांब जरा पांखरा, येउं दे मला
गड्या, जीव भागला.

घरघरते दिनरजनी
भेसूर तिचीं गाणीं
गेलों मी भांबावुनि
येउं दे मला, गड्या जीव भागला. १

जें मागें तें न मिळे
हंसतें मज जग सगळें
बैरागी मन झालें
येउं दे मला, गड्या जीव भागला. २

तूं स्वतंत्र तव जीवन-
लाभावें म्हणुनी मन
उत्सुकलें रे क्षणक्षण
येउं दे मला, गड्या जीव भागला. ३

मी उदास जग उदास
वनवास ये नाशिबास
लागला गळ्यास फांस
येउं दे मला, गड्या जीव भागला. ४

सागर बेफाम होय
तारूं फुटणार हाय
ये नशिबीं 'हाय हाय'
येउं दे मला, गड्या जीव भागला. ५

उडतों तों पंख गळे
वदतों तों वदन खिळे
झालें हें गात्र लुळें
येउं दे मला, गड्या जीव भागला. ६

ही बेडी लोखंडी
रुतली हाडोहाडीं
तोडच, घेतोंच उडी
येउं दे मला, गड्या जीव भागला. ७

# संध्याकाळ.

रवी गेला केव्हांच पश्चिमेला
रंग सोन्याचा तोहि मलिन झाला
अतां लवकर काळोख पसरणार
आणि गरिबांचे कष्ट संपणार! १

पलीकडल्या डोंगरांतून गाई
चरुनि मागें लागल्या परतण्याही
गुराख्यांची धाकुटीं बाल्य बाळें
गुरामागें चाललीं करित चाळे. २

मळा अपुला खुरपून नांगरून
बैल हांकित परतला बागवान
घरीं त्याचीं बालकें अंगणांत
उभीं असतिल-असतील बघत वाट. ३

उभी उत्सुक असणार बघत वाट
धनिण त्याची गरिबींत भाग्यवंत
नसे तीचा कृत्रीम डामडौल
प्रेम सात्त्विक तेथेंच पण पहाल. ४

कष्ट दिनभर जरि करितसे उन्हांत
जरी चाले संसार गरीबींत
घरीं येतां-स्वर्ग तो तुच्छ त्यास
नेत्र भिडले मग उणिव नच सुखास. ५

# दुर्दिन आणि दिवाळी !

' ती येणार कधीं, तुम्हीच म्हणतां आली दिवाळी अतां,
ती येईल उद्यां, असें कितिकदां खोटेंच कां सांगतां,
जेथें गांव असेल जाउनि तिथें आणूंच बोलावुनी
आम्हांला तुमचीं नकोत असलीं खेळावया खेळणीं.'

तों, त्यानें फिरवीयलें मुख, हंसें कैसेंतरी आणिलें
बाळांनो, तुमचा पिता, रडतसे, ह्या अंतरीं संप्रती.
त्याचें काय तुम्हांस, प्रश्न तुमचे ज्वाळाच त्या जाळिती
आलें जें नशिबीं लहानपणिंही तें पाहिजे जाणिलें.

चिंता, क्लेश सदैव; दैव फिरलें कंठीतसे दुर्दिन
बाळांचीं हंसरीं मुखें क्षणभरी आनंदवीती पण.
तो आनंद क्षणांत मावळुनिया केव्हां असा जातसे
दुःखाला कवटाळिता पण हंसें बाहेर दावीतसे.

व्हावें सौख्य म्हणून तूं, प्रभुवरा, देशी दिवाळी जर
ह्या बाळाकरवीं असें मग बरें कां बोलवीशी तर !

## द्वाड मनी.

गुणी आणि अवगुणी-अशी ही द्वाड आमुची मनी.

जशी काय ही बाई कोणी
आली बर्फाच्या देशांतुनि
अंगाला कापूस डकवुनी
मऊ रेशमाहुनी—अशी ही द्वाड आमुची मनी. १

डोळे इवलाले लुकलुकती
अधिकच घारेपणांत खुलती
नजर असे पण चोरटी किती
सदा दंग अंगणीं—अशी ही द्वाड आमुची मनी. २

दंग अशी खेळांत तरीपण
गर्का देइल (तोहि एक क्षण)
आणि काय-ये ध्यानीं मागुन
प्यालि दूध चोरुनी-अशी ही द्वाड आमुची मनी. ३

मनी मावशी माझि मांजरी
तुम्हाहुन लाडकी कितितरी
बिलगूं का-पण पळाली दुरी
मला ओरबाडुनी—अशी ही द्वाड आमुची मनी. ४

अशी द्वाड तर, गट्टि सोडुं का?
किंवा थोडें दूध तोडुं का?
वाळुन ही पण जाइल अक्का.
नका बोलुं हिज कुणी-लाडकी जरी द्वाड ही मनी. ५

# तेव्हां आणि आतां.

मायभूमिसेवाधर्मीं प्राण दिले ज्यांनीं
तेच कृती तुमची बघती विस्मयें करोनी!

महाराष्ट्र म्हणजे उमदी रांग शिपायांची
महाराष्ट्र म्हणतां दिसती पाउलें शिवाचीं

महाराष्ट्रभूमी आहे मुनी महात्म्यांची
सळसळतो भगवा बाणा तिच्या नसांतोनी.

असे मराठ्यांची ख्याती--मनानें उदार
नित्य नेम समशेरीची प्यावयास धार

उगाळून मरणा प्याले भाग्यवंत वीर
तुळायास त्यांना नव्हते दुजे वीर कोणी.

महाराष्ट्र स्वातंत्र्याचा इमानी शिपाई
पीत आग ध्येयासाठीं पुढारीच जाई

संकटें सुखानें ह्यानें नित्य सोसुनीही
काय मार्ग ह्यातें नाहीं उमगला अजोनी?

# कला आणि भावना.

–आणि हातीं घेऊन कुंचलीस
सजे रंगाचा कराया विलास
मनीं उसळत जरि कल्पनातरंग
भावनेचा पण उणा रागरंग. १

कल्पनेचा जरि आणिला उठाव
तरी रंगेना मनांतील भाव
पूर्ण अंकित पण कला मला होती
भाव नसला तरि नसो–नसे भीती. २

भावबंधन रंगलें जरी नाहीं.
तरी यत्नें साधिलें सर्व कांहीं
चित्र झालें मग पूर्ण रंगवून
करी जो तो तैं व्यक्त समाधान. ३

करी जो तो जरि स्तुती अर्थपूर्ण
तरी माझी कुंचली उदासीन
कला वदते लाजून 'किती छान'!
चित्र चित्ताला वाटलें अपूर्ण. ४

कला वैभव जरि समाधान देत
तरी जागी जाणीव होय तेथ
भाववादी मन विचारांत दंग
समाधीचा तितुक्यांत होय भंग. ५

सुरी होती हातांत–तोंच, वेगें
दिली भिरकावुनि पटावरी रागें
भावसृष्टीवर कलेनें खुलावें
चित्र काविचें मग हृदीं सांठवावें.– ६

# जाणीव आणि मरण.

गेली रात्र सरूनः आणि फुटलें पूर्वेकडे तांबडें
त्यायोगें धरणीवरी प्रगटला उत्साह चोंहींकडे
झाडांच्यावरती पुन्हां टवटवी मोहून आली असे
सृष्टीतें बघुनी प्रसन्न, मनही आनंदुनी जातसे.

झाली वेळ म्हणून-सान मुलगा शाळेकडे धांवला
झाली वेळ म्हणून-बाप अपुलीं कामें करूं लागला
झाली वेळ म्हणून-दक्ष जनता कार्यामधें गुंतली
माझी वेळ कधीं न येत म्हणुनी खंती मना वाटली.

कां कीं, मी करितों सदैव वसती त्या मातृभूमीवरी
येतां संकट काडिमात्र करितों कांहीं न हें जाणिलें
'कर्तव्यच्युत' हें विशेषण मला मी पाहिजे लाविलें
आतां मृत्यु न वेगळा, खुपसिली ही जाणिवेची सुरी.

आतां भीति मला नसे, मरण तें केव्हांच आलें असे
मृत्यू काय करील, येइल पुन्हां?—तो एकदां येतसे.

## कळली तव मायावी करणी.

कां रे नच येशी अजुनी
कळली तव मायावी करणी.

मी कुंवरी वनबाला
जागुनिया वचनाला
आलें पण काय तुला
येइ मीच म्हणुनी
कळली तव मायावी करणी. १

माथ्यावरुनी ढळला
चांदहि, टळली वेळा
धीर न धरवे मजला
जीव जाइ शिणुनी
कळली तव मायावी करणी. २

क्षण क्षण कंठायाला
लाविशि सखया, मजला
ठाउक ज्याचें त्याला
जाशि हृदय हरुनी
कळली तव मायावी करणी. ३

येच अतां, मी बघतें--
कोण तुझ्याशीं वदतें.
पण--मन कां बावरतें
येइ हृदय भरुनी
कळली तव मायावी करणी. ४

## देवापाशीं गरिबाचें मागणें.

देव ओलांडुनि धरा घरीं गेला
मीहि अपुल्या पण चाललों घराला
पंख आशेचे खेचितीं अम्हांला
गरीबीला ते जडच्र ओढण्याला. १

सर्व दिनभर कष्टांत मरायासी
देवराया ते देतसे अम्हांसी
आज पण ह्या पंखांत जीव नाहीं
धरेवरती गळणार खचित तेही. २

असें झालें तर-धनिक करिल काय?
अम्हांवांचुनि तो करिल हाय हाय
कोण त्याचे करणार कष्ट बोला,
जगव आम्हांला म्हणुनि रे दयाळा. ३

मागणें गरिबाचें हें ऐकिलें खास तेवढें
घडामोडी किती होती ठाम त्यामाजि एवढें !

# आगरकर.

निंदेचे शर तीक्ष्ण सोसुनि जनीं आणावया जागृती
सत्कर्मप्रतिपालनार्थ झटसी-ऐशी तुझी योग्यता!
रूढीचे दृढपाश जे खिळुनिया आम्हांमधें राहती
त्यांचें भस्म करावयास अपुली तूं चेतवीली चिता.

विश्वव्यापक तत्त्व जें ठसविलें तूं ह्या समाजामधें
त्याच्या आचरणांत नाहिं टिकलें कित्येक खंदे सुधे
तूझा निश्चय मात्र निश्चल खरा, तूं संकटें सोसुनी-
रानें तोडुनि मंगलप्रद नवी केली पुन्हां पेरणी.

तेव्हांचें जग हांसलें तुज अतां हांसें तयाचें पण
तूं तेव्हां झटलास, आजहि कुणी स्वार्थाप्रती होमुन-
नीतीचा पथ धीर देउनि करी तेजोबळें उज्ज्वल.
दृश्य स्मारक हें तुझें बघुनिया मी होय हर्षाकुल.

ऐसे थोर सुपुत्र, हेंच अमुचें देतें अम्हांला पुणें
आम्ही निंदुन त्यांस मात्र, क्रमितों लाजीरवाणें जिणें.

# मायबापा !

झाड तूझें-त्यावरी बांधणार
सान घरकुल मी-तूंच रक्षणार
तुझ्या पंखाखालती भय कशाचें?
चोंच तूझी रक्षील शरिर माझें. १

उंच अगदीं गगनांत जरी जाशी
तुझी प्रीती सारखी पिलापाशीं
सान माझी ही चोंच 'आ' करून
वसे कोटरिं मी-येशि तूं म्हणून. २

दिसे येथुन भोंवतीं उभें पीक
धनी तेथिल उपजवी फार धाक
किती मौजेची असे ही सकाळ
अशिच राहिल कां फार फार वेळ? ३

अशिच राहिल जर फार फार वेळ
किती मौजेनें जगत खेळवील
ऊन नाहीं मुळिं अजुन त्रास देत
गार वारा उल्हास नवा देत. ४

आणि येथें मी करुनि चिवचिवाट
तुला बाहिन—पाहीन तुझी वाट
तुझी स्वारी खालती येत आहे
खिळति नजरा मग स्वर्ग अचल राहे. ५

# रवि तळपे डोईवर.

रवि तळपे डोईवर
शेतांत खपे नांगर
कृश बैलांची जुपुनी जोडी
आल्या दिवसा ओढुन काढी
कष्ट सारखे ऐसे ओढी
विसांवा न घडिभर. १

कष्ट वर्षभर करील जेव्हां,
अर्ध्या पोटीं राहिल जेव्हां,
ऐदी श्रीमान् जगतिल तेव्हां
खपे मरेतोंवर. २

आकाशाचा वरी आसरा
खालीं प्रेमळ जगविते धरा
शांती द्याया-वाहे वारा
अढळ भाव प्रभुवर. ३

शेत तयाचें जेव्हां पिकतें
मन आनंदुन तेव्हां जातें
वैभव हें पण पळभर टिकतें
पुढें दिवस खडतर. ४

चित्र असें हें जेव्हां दिसतें
होरपळुन मन वेडें होतें
गाणें दुःखावेगें फुटतें
आणि तुटे अंतर. ५

# निरोप.

मज सोड जाउं दे मजला
या भणंग बैराग्याला. जिवलगे-

मी असा अभागी म्हणुनी
आकाश कोसळे वरुनी
माझाच दोष परि तुजला
बुडविण्यास कारण झाला.

लाडके हौस मीं नाहीं
पुरविली तुझी तर कांहीं
हीं अजाण पोरें अजुनी
सांभाळ तयांना जपुनी.

संग्रहा ठेविली कांहीं-
फुटकीही कवडी नाहीं
तो देव जगाचा वाली
काळजी तयाला अपुली.

जा कशी
उगिच कां अशी
उभी राहशी
जाउं दे मजला
शृंखलांस भेटायाला-जिवलगे-

त्या भयाण देखाव्याची
त्या निबीड अंधाराची
वाटते काय तुज भीती
करुं नको कल्पनाही ती.

मायभूमिसाठीं मान
अर्पिल्या सांग आम्ही ना?
जग नाहीं साधेभोळें
हें अंधाराहुन काळें.

पुसुन टाक गंगायमुना
जा घेउन या बाळांना
जातील दिवस हे असले
सोन्याचे अपुले पुढले.

जा कशी
उगिच कां अशी
उभी राहशी
जाउं दे आतां
वाहुं नको माझी चिंता–जिवलगे.

# बाळांनो !

सहज तुम्हां बघुनी मजला किती हर्ष होई
गौर मृदुल वदनावरती जणूं फुलें जाई.

सकल विश्व सोनीयाचें रम्य रूप घेतें
स्वर्ग येत धरणीवरती तुम्हां खेळण्यातें
भाग्यवंत बाळांनो, गा तुम्ही मधुर गीतें
तुम्हांवरी उधळो अपुले रंग उषाताई.

दिवस कोवळे हे असले, स्वप्नवत् अम्हांला
आज कसा नकळत झाला जिवाचा उन्हाळा
फुलें जिथें हंसलीं अमुचीं तिथें आज ज्वाळा
करूं नको देवा, आतां इथें तरी घाई.

फूल गळुन कांटे अमुच्या टोचिती जिवाला
फूलपांखरांनो, गुंगा ऐकुं द्या अम्हांला
–आणि अम्ही विसरुनि आम्हां आमुचाच पेला
असो तो विषारी झोकूं नशिबास येई.

# उभा ‘ चोखा ’ बाहेर.

तुळस नसली तरि–असे तुळशिबाग
बेल नसला तरि–म्हणा बेलबाग
देउळें हीं शहरास भूषवीती
भाव–भक्तीची वाढवीत कीर्ती. १

करा उत्सव प्रतिवर्षिं ह्या ठिकाणीं
थाट उडवा मग कीर्तनें करोनी
असे आवडि देवास विलासांची
आणि भक्तांना असे हौस त्याची. २

‘ अणूरेणूंतुन असे देव ’ ऐसें
तुका वेडा गुणगुणत गात बैसे
अम्ही सजल्याविण अम्हांला दिसेना
देवरायाजी क्षीण लोचनांना. ३

देव दडले जरि असे कपाटांत
तुम्ही गर्जा मग उठुन बैसतात
चौघड्यांना वाजवा नगाऱ्यांना,
भक्तिभावें आळवा देवराणा. ४

आणि तोही तुम्हांस पावणार
तुम्ही गुंफा त्याजला सुमनहार
जरी निर्मळ होईल पण विटाळ
उभा ‘ चोखा ’ बाहेर–शिवुन घ्याल. ५

## सह्याद्रींतील वर्षाकाळ.

उमललें
विश्व हांसलें
प्रथम का येथें?
रमणीय सृष्टि येथील पाहुनी वाटे. १

गिरिंतुनी
झरे खळखळुनि
वाहती नित्य
हे पाट रुप्याचे फेनतात अभिजात. २

मखमाल
कितीक लुटाल
रंगिबेरंगी
संपन्न मराठी वैभव जागोजागीं. ३

पाऊस
नव्हे-तो भास!
हिरकण्या झडती
मग खिशांत लोभी बोटें चुळबुळ करिती. ४

ये मधुन
धुकें भरभरुन
दृष्टि बावरते
जणुं पिशाच्च अमुच्या परिस्थितीचें प्रगटे. ५

ये किरण
धुकें भेदून
क्वचित हें घडतें
अस्मान फोडुनी बाल बिजलि कीं येते. ६

ते दूर
गिरी गंभीर
वृद्ध मुनि मानी
ध्यानस्थ बैसले ढगांत आच्छादोनी. ७

चहुंकडे
अजूनी खडे
मराठी किल्ले
गतवैभव स्मरुनी ढगांत वाटे शिरले. ८

शौर्याचि
शर्थ व्हायाचि
स्थळें तीं येथें
जरि कळे न कैसें स्फुरण परंतू येतें. ९

शोभती
तरू तरि किती
जातिजातींचे
माहेर विलासी वन्य सृष्टिदेवींचें. १०

स्वच्छंद
लुटुनि आमोद
फुलांतिल सारा
वाहतो भरारा कांपवीत वन वारा. ११

खालती
खोल तरि किती
दरी ही हिकडे
भीतिनें जिवाचे होती तुकडे तुकडे. १२

दिलदार
वायुवर स्वार
चपळ कोकीळ
घालीत साद राणीस गडी रंगेल. १३

नजरेंत
ठरूं नहि देत
घार स्वच्छंदी
दशदिशा मोकळ्या नही जगाची बंदी. १४

पायांत
आमुच्या नित्य
बिडी लोखंडी
जाणीव तयाची हृदय सारखें फाडी. १५

तरि इथें
अहा! वाटतें
स्वैर मी पक्षी
दशदिशा मोकळ्या तरंगतों आकाशीं. १६

## जाणिवेचें शल्य.

दाही दिशांत माझी
मज पूज्य मायभूमी
ऐशी न अन्य कोणी
अभिवंदितों तिला मी.

आजन्म कष्टवोनी
त्रैलोक्य भूषवीलें
ते लोकमान्य आतां
सुरलोकमान्य झाले!

मी नित्य बोल त्यांचे
ऐकोनि धन्य झालों.
केलें मुळीं न कांहीं
भूभार मात्र झालों

हें शल्य जाणिवेचें
माझ्या जिवास बोंचे

हा आमुचा महात्मा
आम्हांस उंचवीतो
भाऊ म्हणोनि आम्हां
सर्वांस गौरवीतो.

झाला तुरुंगवासी
आम्हांस लाज नाहीं
आम्ही पशू विलासी
कांहीं करीत नाहीं

हें शल्य जाणिवेचें
माझ्या जिवास बोंचे

# म्याक्स्वेनी.

कोठें तुझा देश, मी दूर कोठें वसें ह्या महाराष्ट्र देशामधें
दोघें 'पराधीन' हें एक नातें पुरेसें असे आज आम्हांमधें
माझ्या घरीं माय माझी उदासी तशी ती तुझीही असे आजला
चित्तीं अहोरात्र हें शल्य माझ्या, तसें तें सख्या जाळितेही तुला.

आले हिमाद्री जरी संकटांचे, तरी टेकड्या त्या तुला वाटती
तूं सोसिलीं संकटें काळभेदी, तयाची नसे तूजलागी क्षिती
दृष्टीपुढें तूझिया मायभूमी दिसे एकटी तीच ती देवता
ऐसा महात्मा जगांतून जातां मनीं काय होई नये सांगतां.

प्रेमें जिनें वाढवीलें जयाला जपोनी खपोनीच अंकावरी
नेतां तया वाघिणीच्यापरी ती पहा जाहली कावरीबावरी
खोऱ्यांदऱ्यांतून धुंडीत आहे तुला जन्मदात्री तुझी सावली
पाहोनि हें चित्र भारावलो मी मुक्यानें तुला अर्पितो अंजली.

## शर सुटला भात्यांतुन.

शर सुटला भात्यांतुन
मृग पळे जीव घेउन

हिरवें तृण खालती कोवळें
होतें कोठें अतां उगवलें
जीव भुकी रानचे रंगले
पण मुखीं घांस कोठुन. १

बाळपांखरें झाडावरती
चित्र खालचें बघुन थरकती
पंखांतिल सांवरती शक्ती
चिवचिवाट भेदी मन. २

वाऱ्यावरती जरि त्याचि गती
धावुन धावुन धावेल किती
शर आला बघ–फुटली छाती
चळचळा कांपतें वन. ३

लागला शर तो नच जोंवर
अम्ही रंगांत दंग तोंवर
गुंतला जीव तिजोरीवर
पण नकळे पुढच्या क्षण

शर सुटला भात्यांतुन
मृग पळे जीव घेउन. ४

# आनंद आणि विरह.

तुला बघुनी मज किती मोह होई
खुडायासी हा हात पुढें जाई.
गंध सुटला बागेंत किती छान
रसिक जमलेले जाहले प्रसन्न. १

झाड आंब्याचें जुनें फुलुन गेलें
वसंताचे भाटही पुन्हां आले.
किती वाटे ही गोड तर लकेरी
वसंताची ही कृपा, फुला! सारी. २

इथें वाटे मज सारखें बसावें
तुझ्या सन्निध नादांत गुंग व्हावें.
आणि मग जीं गाइन गोड गाणीं
तृप्त होइन मी तींच गुणगुणोनी. ३

काय ह्याहुन जगतांत सौख्य आहे
निसर्गांतच तें पुरें पुरें राहे
झरा सौख्याचा वाहतो खळाळा
लूट रसिका, आनंद बहरलेला. ४

–असें इतुकें जरि, तरी मन उदास
खिन्नता कां येतसे अशी ह्यास?
विरह तीचा–मज फार त्रास देई
फुला, म्हणुनी नच तोडितों तुला मी. ५

## होई न उणें कोठार तरी.

एक मूठ घालशी जरी
होई न उणें कोठार तरी.

अनंत पिकतें ह्या भूमीवर
कृपाळू किती आहे ईश्वर
क्रोडोपति तूं उपकारी. १

महाल मोठा दुरुनी दिसला
तुझा दरारा वैभव झाला
इलाख्यांत ह्या नाहिं सरी. २

बोलुनचालुन मी दरवेशी
निष्ठुरता कां तूं दाखविशी
फिरूं नको, वळ माघारी. ३

माझ्यासंगें बघ वणवणते
माय आंधळी— ही तडफडते
मजा कुठवरी बघशि तरी. ४

घसा कोरडा, देवा झाला.
बळ नच मजला विनवायाला
लाचार तुझा, पाय धरी. ५

एक मूठ घालशी जरी
होई न उणें कोठार तरी.

८८

To,

## हरि सखाराम गोखले.

' अंधार
घोर चौफेर
भरे भय फार '
पण उज्ज्वल कवनें तुझीं देत मज धीर. १

' बेसूर
आणि भेसूर
सर्वथा क्रूर--
श्वापदें इथें ' जरि, तीव्र तुझा पण तीर. २

' कोंडला
भृंग मोकळा
तुजमुळें झाला '
हा तुझा विनय चढवितो तुला पदवीला. ३

' आरक्त
पूर्ण अनुरक्त
गुणाचा भक्त '
मित्र तूंच माझा कवी थोर विख्यात. ४

## वीणामण्डळाचीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| यशवंती | ८१० |
| वीणाझंकार | ८८ |
| इंदुकला | ८३ |
| किरण | ८४ |
| अभागी कमल | ८१२ |
| काव्य-विचार | १ रु. |
| उषा | ८१२ |

पत्ता:—वीणामण्डळ,

४६१ शनवार, पुणें.